## नि.दि.मु.क्र.६३/२०१८ मधील निशाणी क्र.६४ वरील आदेश
## (CNRNo.MHSI090003302018)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादी क्र. ०१ ते ०४ यांचा जबाब वाचला. उभय पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला. उर्वरीत प्रतिवादींना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी सदर अर्जास आपले म्हणणे सादर केलेले नाही.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादीने प्रतिवादी क्र.१७ भिमसेन श्रीधर कोमुर्लेकर यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास विनंती केलेली आहे. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१७ भिमसेन कोमुर्लेकर हे दि.२०/०७/२०१९ रोजी मयत झाले आहेत. सदर बाब वादीने शपथपत्र दाखल करुन पुष्टी दिली आहे. प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.१७ हे मयत झाल्याची बाब नाकारलेली नाही. वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी क्र.१७(१) ते १७(३) हेच मयताचे वारस आहेत. दाव्याचे स्वरुप बघता दाव्याचे कारण अबाधित राहत असल्याने व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २२ ची व्याप्ती लक्षात घेता अर्ज मंजूर करणे न्यायसंगत वाटते. परिणामी, खालील प्रमाणे आदेश पारित करत आहेः

### – आदेश –

०१. निशाणी क्र.६४ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. मयत प्रतिवादी क्र.१७ यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन दुरूस्ती प्रत पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी दाखल करावी.

०३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.02.15 16:15:16 +1000

स्थळ : देवगड (एस.बी.वाळके)

दिनांक : १४/०२/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.